प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
RBI On Internet: http://www.rbi.org.in
हिन्दी वेबसाइट http://www.rbi.org.in/hindi
Email: helpprd@rbi.org.in

प्रेस सम्पर्क प्रभाग, केंद्रीय कार्यालय, पोस्ट बॉक्स 406, मुंबई 400 001
फोन: 2266 0502 फैक्स: 2266 0358, 2270 3279

PRESS RELATIONS DIVISION, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

**दिनांक : १९ डिसेंबर, २००६**

**भारतीय रिझर्व बँक फेरेटिक स्टेनलेस स्टीलची रु २ ची नवी नाणी प्रसारित करणार**

भारतीय रिझर्व बँक, ''विभिन्नतेत एकता'' (युनिटी इन डायव्हर्सिटी) या विषयावरील फेरिटिक स्टेनलेस स्टीलची रु २ ची नाणी लवकरच प्रसारित करील.

ही नाणी गोलाकार २७ मिमी व्यासाची असून त्या नाण्यांमध्ये १७ % क्रोमिअम व ८३ %लोखंड असेल.

नाण्याच्या दर्शनी पृष्ठ भागाचे तीन विभाग असतील. मध्य - विभागात अशोक स्तंभामधील सिंह असून त्याखाली ''सत्यमेव जयते''हे ब्रीद वाक्य लिहलेले असेल, तसेच त्या नाण्याचे मूल्य '२' आंतरराष्ट्रीय अंकात ठळकपणे दर्शविलेले असेल. सर्वात वरच्या भागात हिंदीमध्ये ''भारत'' व इंग्रजीत 'इंडिया' हे शब्द असतील. खालच्या विभागात आंतरराष्ट्रीय अंकात वर्ष दिलेले असेल. नाण्याच्या मागील पृष्ठ भागावर, आपल्या देशाचे वैशिष्ट्य ''विभिन्नतेत एकता'' शैलीपूर्ण रीतीने दर्शविलेले असेल. हे चिन्ह ''चार शिरे परंतु एकच शरीर'' या स्वरुपात दिसेल. आपल्या देशातल्या सर्व भागांमधील लोक एकाच झेंड्याखाली एकत्रित येऊन त्यांचे एकच राष्ट्र बनले आहे असा विचार यातून प्रकट होतो. दृष्ट स्वरुपातील या चिन्हामुळे नाण्याचे मूल्य चिन्हाशी जोडले जाऊन नाण्याची ओळख लगेच पटते. डावीकडील परिघाजवळ हिंदीत ''दो रुपये'' व इंग्रजीत ''टू रुपीज'' हे शब्द आहेत.

नाणीविषयक आधिनियम, १९०६ मधील तरतुदींनुसार हे नाणे एक वैध चलन आहे. सध्या प्रसारात असलेली दोन रुपयांची नाणी देखील वैध चलन म्हणून समजली जातील.

पी.व्ही.सदानंद

व्यवस्थापक

प्रेस रिलीज : २००६-२००७/८३५